ऑक्टोबर २००७

# भारताच्या संविधानाची शान राखा

सभासद व ठेवीदार यांच्या माध्यमातुन पैशाची देवाण –घेवाण करणाऱ्या बँका व पतसंस्था यांच्या एकंदरीत कामकाजाच्या पध्दतीवर प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे नकारात्मक फासे आवळण्याची मोहीम काही सुप्त शक्तींकडून चालू झाल्याचे अलीकडच्या काळात निदर्शनास येत आहे.

**२५ जुन व १ ऑगस्ट २००७ रोजी** जेष्ठ व थोर समाज सुधारक मा. अण्णासाहेब हजारे यांनी राज्य सरकारला दिलेल्या निवेदनाची परिणीती हळूहळू विस्तारीत होत चाललेली आहे. **ठेवीदारांनी ठेवलेल्या ठेवी मुदत संपल्यानंतर किंवा मुदत संपण्यापुर्वी मागताक्षणी पतसंस्था व बँकानी दिल्या पाहीजेत,** ही मा. अण्णासाहेब हजारेंची अपेक्षा होती. आणि त्यानुसार शासनाने आपल्या सहकार खात्याच्या माध्यमातुन ही मागणी पुर्ण करण्यासाठी अत्यंत घिसडघाईने पाऊले उचलली. ज्यांनी ठेवीदारांचे पैसे नात्या– गोत्यामध्ये व हितसंबधी लोकांना कर्जरुपाने वाटले किंवा वाटून घेतले त्यांचेवर, फौजदारी कारवाई होणेसाठी त्या पत्रामध्ये मागणी केलेली आहे. याचा अर्थच असा की, राज्यातील बँका व पतसंस्था या बाबतीत मा. अण्णासाहेब हजारे यांची मागणी सर्वांसाठी आहे, हे गृहित आहे.

परंतु या मागणीचा गैरअर्थ काढून राज्यातील प्रत्येक जिल्हयात, तालुक्यात, वॉर्डात वेगवेगळे अनुभव बँका व पतसंस्थांना येवू लागले आहेत. यामध्ये शासकीय अधिकाऱ्यांनी सुध्दा मोठ्या प्रमाणात या विषयाचा सोईस्कर गैरअर्थ काढून लाखो रुपये पतसंस्थांकडून उकळले. पतसंस्थांना घाबरविले. आणि त्याची अधिकृत माहिती सबंधितांनी आमच्याकडे विदीत केलेली आहे. त्या शिवाय दिलेल्या कर्जाची थकबाकी येथून पुढे कुठल्याही परिस्थीतीत वाढू नये व झालेली थकबाकी वसूल करण्यासाठी सर्तक झाले पाहिजे असे संचालकांनी ठरविले. थकीत रक्कम वसूल करण्याची व ठेवीदारांच्या ठेवींच्या रकमा त्यांना मागता क्षणी देण्याचीही कायदेशीर जबाबदारी संचालक मंडळाची असल्यामुळे, थकीत कर्जाच्या वसुली संदर्भात आणखी जास्त सतर्कता येणे क्रमप्राप्त आहे. ही बाब त्या दृष्टीने योग्यच आहे.सहकार कायद्याप्रमाणे कलम ७३,७८,८३,८८,व ९५ प्रमाणे कारवाई करणे व वेळ पडली तर सबंधीत संस्थावर आय.पी.सी.खाली गुन्हा दाखल करणेसाठी रितसर तक्रार करणे, इतपर्यंतचे सर्व अधिकार सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांस प्राप्त आहेत. आणि एवढे असून देखील दि. १ सप्टेंबर २००७ रोजी महाराष्ट्र राज्याच्या सहकार आयुक्तांनी एका परिपत्रकाव्दारे,**''पतसंस्थांमधील प्रत्येक संचालकाने किमान रूपये दहा हजार ते जास्तीत जास्त रूपये दिड लाख आपल्या पतसंस्थेत ठेव ठेवली पाहिजे''** असे जाहिर केले. हा एकतर्फी आदेश कायद्यानुसार नाही. पतसंस्थांच्या कार्यक्षेत्राप्रमाणे संचालकांनी ठेवी ठेवणे, हे तर आश्चर्यजनकच आहे. **''संचालक मंडळ सदस्यासाठी पात्रता ''** ह्या उपविधीतील कलमामध्ये दुरुस्ती करण्यात यावी असे घोषीत केले. संचालक मंडळाच्या **निवडणूकीत भाग घेवू ईच्छिणाऱ्या सभासदाने वरीलप्रमाणे स्वत:च्या नावाने ठेव ठेवली पाहिजे** असे बंधनकारक केले आहे. ( सोबत हे परिपत्रक छापले आहे.)

वरील परिपत्रकावरुन असे लक्षात येते की, उपविधी, सहकार कायदा व भारताच्या संविधानाचा विचारच केला गेला नाही . म्हणून असे परिपत्रक राज्याचे सहकार आयुक्त काढू शकतात का ? हा खरा प्रश्न उभा राहिलेला

आहे.

**भारताचे संविधान, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व दि रिप्रेझेंटेशन ऑफ द पिपलस् ॲक्ट, १९५०** यांना एकत्रित वाचण्याची आवश्यकता आहे.भारताच्या संविधानाच्या कलम १४ नुसार **समानतेचा हक्क** देशातील प्रत्येक नागरिकास प्रदान केलेला आहे. म्हणजेच संविधानाच्या भाषेत **राज्य कोणत्याही व्यक्तिस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही**. संविधानातील कलम ३९ ग नुसार **आर्थिक यंत्रणा राबविण्याचा परिणाम म्हणून संपत्तीचा व उत्पादन साधनांचा संबंध सामूहिक हितास बाधक होईल, अशाप्रकारे एकाच ठिकाणी होवू नये.** संविधानाच्या कलम ४४ नुसार **नागरिकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र एकरूप नागरी संहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील,** असे स्पष्ट अंतर्भुत केलेले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २२ नुसार कोणत्या व्यक्तिस सहकारी संस्थेचे सभासद होता येईल? कलम २७ नुसार सदस्यांचे मतदानाचे अधिकार काय? कलम २८ नुसार भाग धारण करण्यावर काय निर्बंध आहेत? कलम ७३ फ फ नुसार समितीच्या सदस्यत्वासाठी पात्रता काय आहे? याची स्पष्ट तरतुद आहे.आणि सहकार कायदा बाजुला ठेऊन राज्याचे मा. सहकार आयुक्त वरिलप्रमाणे परिपत्रक जबरदस्तीने लादू शकत नाही. आदर्श उपविधीमध्ये दुरूस्ती करण्यास भाग पाडून त्याला लोकहिताचा मुलामा देवून, निवडणूक लढविणाऱ्या सभासदाने स्वत:च्या नावावर त्या पतसंस्थेमध्ये कार्यक्षेत्राप्रमाणे ठेवी ठेवणे बंधनकारक करणे, हे लोकशाहीतील अतिरंजीत व महंम्मद तघलकी सारख्या प्रवृत्तीचा प्रकार आहे.

सहकार कायद्याचे कलम १४ मध्ये **निबंधकास उपविधीत सुधारणा करण्याबाबत निर्देश देण्याचे अधिकार आहेत. परंतू ते संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट असले पाहिजे अशी तरतूद आहे.** परंतू मा. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकाप्रमाणे या गोष्टी दुर्लक्षिल्या आहेत. कारण कलम १४ (१) व (२) नुसार निबंधकाने हि कृती केलेली नाही. पहिली बाब म्हणजे उपविधीतील हि दुरुस्ती पतसंस्थांच्या हिताची नाही. **धनिक लोकांनीच पतसंस्था चालवाव्या हे अंतिम सत्य निष्पन्न होणार असल्यामुळे , असे परिपत्रक पतसंस्थांच्या मुळ संकल्पनेस तिलांजली देणारे ठरणार आहे.** असे परिपत्रक काढण्याचा हेतू वरकरणी उदात्त दाखविला आहे. परंतु त्याचे परिणाम काय होतील? याचा मात्र जरा सुध्दा विचार केलेला नाही. एवढेच नव्हे तर भारताचे मूळ संविधान आपल्याला असे करण्यास परवानगी देते का? याचा तर स्वप्नात सुध्दा विचार केला गेला नाही. देशातील प्रत्येक नागरिकास **समानता** या शब्दाबद्दल नितांत आदर आहे. आणि या मूळ संकल्पनेवरच भारत देश ऊभा राहिलेला आहे. देशामध्ये लोकसभा व राज्यसभा, राज्यामध्ये विधानसभा व विधान परिषद, जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदा, तालुक्यामध्ये तालुका पंचायत समिती, महानगरांमध्ये महानगरपालिका /नगरपालिका / नगरपरिषदा, गावांमध्ये ग्रामपंचायती, सहकारी संस्थांमध्ये राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था, ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या, पगारदार कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्थांचा समावेश होतो.

बँका व पतसंस्था ठेवी गोळा करतात, कर्जे वाटप करतात व कर्जे वसुली करून पुनश्च: कर्ज वाटपास निधी उभा करतात. त्यामध्ये काही ठिकाणी ठेवी परत मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. कर्जवाटपातील सदोष पध्दत, कर्ज मर्यादेबाहेर कर्जवाटप, कर्ज अर्जाची छाननी न करता कर्ज वाटप, परतफेडीची क्षमता न तपासता कर्जवाटप,

ह्या कमी–जास्त प्रमाणात अडचणी आहेतच. परंतु ह्या सर्व गोष्टी पतसंस्थांसहीत वरील सर्व इतर संस्थांमध्ये देखील कमी जास्त प्रमाणात आहेच. आणि अशा वेळी पतसंस्थांच्या बाबतीमध्ये राज्याच्या सहकार आयुक्तांनी, संचालकांनी स्वत:च्या नावाने ठेवी ठेवण्याचे बंधनकारक करण्याचे परिपत्रक काढणे हे, राज्याला आर्थिक संभ्रमात व संशयाच्या भोवऱ्यात पोहचविण्याचे काम केलेले आहे.

**असंविधानिक व गैरलागू आदेश / परिपत्रके लादण्याचे काम किंवा बंधनकारक करण्याचे अधिकार भारताच्या संविधानाने कोणासही दिलेले नाहीत.** पतसंस्थांनी वितरीत केलेली कर्जे थकीत झाल्यास वसुली करणेसाठी योग्य ती उपाययोजना व नियमावलीसाठी राज्याचे मा. सहकार आयुक्त कुठलेही परिपत्रक मात्र काढत नाहीत. झालेली थकबाकी वसुल करणेसाठी कर्जदार व जामिनदारांना रितसर नोटीसा देणे, कर्ज रोख्यात कर्जदार व जामिनदारांनी सही करून मान्य केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे जमा भागाच्या व ठेवींच्या रकमा कर्ज खात्यात नोटीशी शिवाय परस्पर वळती करणे इत्यादी अधिकार पतसंस्थांना कायद्याने असून देखील, ही थकबाकी वसुलीची कृती बेकायदेशीर आहे असे विधान करणारे व त्या अनुषंगाने पतसंस्थांच्या संचालकांवर द.ड.ण खाली गुन्हे दाखल करून त्या संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करणे कामी रेकॉर्ड तयार करणे व त्या दिशेने पावले उचलणे ही बाब अनाकलनीय आहे. म्हणजेच कर्जाचे वाटप केल्यानंतर जर थकबाकी झाली व झालेली थकबाकी वसुल करण्याची उपविधी व कायद्याला अधिन राहून कर्जदार व जामीनदाराने कर्ज घेते वेळीच लेखी मान्यता देवूनही केलेली थकबाकीची वसुली बेकायदेशीर होवू शकते, असे म्हणणे केवळ चूकीचे नाही तर पतसंस्थांना जाणीवपूर्वक अडचणीत आणण्याची भूमिका स्विकारण्याचाच हा प्रकार आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार आयुक्त मा. रत्नाकर गायकवाड व मा.उमेशचंद्र सरंगी यांनी पतसंस्थांमधील ठेवींना संरक्षण देण्याच्या हेतूसाठी, सहकारी तत्वावर **डी.जी.सी.** नावाची संस्थां नोंदणी केली. राज्यातील मोठ्या पतसंस्थांना करोडो रुपये या डी.जी.सी. मध्ये भाग व ठेव रुपाने गुंतविण्यासाठी स्वत: पुढाकार घेवून, परिपत्रके काढून भाग पाडले. ह्या **डी.जी.सी. चे काय झाले ?** रक्कमा गुंतविणाऱ्या सर्व पतसंस्था करोडो रुपयांच्या व्याजापासून मुकल्या.पतसंस्थांकडून राज्य फेडरेशनमध्ये ठेवी घेणे व राज्य फेडरेशनमधून डी.जी.सी. मध्ये ह्या रक्कमा भागामध्ये गुंतविणे, नोंदणी झाल्यावर त्या काहीअंशीच परत करणे,बेकायदेशीर गुंतविलेल्या रक्कमा परत न आल्यामुळे व सभासद पतसंस्थांच्या त्या त्या पतसंस्थांच्या स्तरावर प्रत्येकी लाखो रुपये नफ्यापासून वंचीत होणे व हे डी.जी.सी. आता मृत अवस्थेत अशीच पडून रहाणे, पतसंस्थांनी डी.जी.सी. कडे भाग व ठेवींच्या रक्कमा व्याजासहीत मागितल्यानंतर डी.जी.सी. ने त्या सर्वांना न देणे, याबद्दल संबंधीत शासकीय यंत्रणा काय करते ?याबद्दल आतापर्यंत का कारवाई केली नाही ? याचे उत्तर कोण देणार ? यासाठी कोणी उपोषणाला बसले पाहिजे ?

एका बाजूला बँका व पतसंस्थांनी मागता क्षणी ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत देण्यासाठी त्वरीत घाईने कारवाई करणे हे समजू शकतो, परंतू थकीत वसुलीसाठी बँका व पतसंस्थांना संरक्षण न देण्याची भुमिका ही आश्चर्यजनक आहे.

बँका व पतसंस्थांनी ठेवीदारांच्या ठेवी मागताक्षणी जर दिल्या नाही किंवा त्यावरील कराराप्रमाणे व्याज दिले नाही तर भारतीय रिझर्व बँक, शासन, सहकार आयुक्त व त्यांचे संबंधित अधिकारी, पतसंस्थांचे संचालक मंडळ बरखास्तीपासून, आर्थिक जबाबदारी निश्चित करण्यापासून ते संबंधित संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना गजाआड करण्याचे काम बिनदिक्कत नियमितपणे, महाराष्ट्र राज्यात करीत आहेत.परंतू **महाराष्ट्र**

**राज्यात साली सहकारी तत्वावरील १६६ सहकारी साखर कारखाने व खाजगी तत्वावरील २३ साखर कारखाने नोंदणी झालेले आहेत.** राज्यातील सर्व सहकारी साखर कारखाने सुध्दा १०० टक्के जनतेच्या पैशांनी उभे राहिलेले आहेत. राज्यातील साखर कारखान्यांना उस पुरवठा केल्यानंतर, **त्या शेतकऱ्यांच्या उसाच्या बिलातून परस्पर विविध प्रकारच्या ठेवींच्या कपाती केल्या जातात. वर्गण्या व देणग्या सुध्दा विविध ट्रस्टसाठी बेकायदेशीररित्या कपाती केल्या जातात.** विविध कारणासाठी केंद्र व राज्य सरकारासाठी मदत / निधी द्वारे परस्पर कपाती केल्या जातात. **शेतकऱ्यांकडून त्यांच्या ठेवींच्या रक्कमा , ठेवींचा कालावधी, ठेवींचे व्याज दर या बाबत कुठलाही अर्ज भरुन घेतला जात नाही. एकाही शेतकऱ्यास कपाती केलेल्या ठेवीबद्दल काहिही माहिती नसते.** कालावधी, रक्कम व व्याज दर या बाबत राज्यातील एकाही शेतकऱ्यास साधी माहितीसुध्दा नाही. त्यामुळे **त्या ठेवी हे साखर कारखाने शेतकऱ्यांना केव्हांच परत करीत नाहीत. एवढेच नव्हे तर, नियमीतपणे त्या ठेवींवर वर्षांनुवर्षे व्याजही देत नाहीत.** शिवाय कारखान्यास २० वर्षे गाळपाचे हंगाम घेवून देखील एक नया पैसा देखील **लाभांष दिला जात नाही. कारखाना कायम संचीत तोट्यातच असतो.**ऊसाच्या बीलातून कापलेल्या शासकीय रकमा शासनाला दिल्या जात नाहीत. **बाहेरून कर्ज उभारण्याच्या मर्यादा ओलांडून** करोडो रूपयांची कर्जे काढून कारखाना उघड उघड आर्थिक दिवाळखोरीत निघाला असल्याचे दिसत असतानासुध्दा, त्या कारखान्याला शासकीय लेखापरिक्षक अ वर्ग देवून मोकळा होतो. **मग या कारखान्यांवर राज्याचे मा. साखर आयुक्त, मा. सहकार आयुक्त, पोलीस, महाराष्ट्र शासन, केंद्र शासन व नाबार्डने आतापर्यंत का कारवाई केली नाही ?** हाच खरा प्रश्न समानतेवर आधारीत आहे.

बँका व पतसंस्थांनी कुठल्याही कारणास्तव ठेवी परत केल्या नाही तर कलम ७३,७८,८३,८८ व ९५ प्रमाणे संचालकांवर कारवाई केली जाते, व फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांना तुरूंगामध्ये डांबले जाते. म्हणून जर बँका व पतसंस्थांच्या संचालकांवर वरीलप्रमाणे तत्परता दाखवून कारवाई केली जाते तर , या साखर कारखान्यांच्या संचालकांवर का कारवाई केली जात नाही ? **याबद्दल मा. साखर आयुक्त, मा.सहकार आयुक्त, सरकार व नाबार्ड काय करते ? भारताचे संविधान साखर कारखान्यांसाठी लागू नाही का ?** ह्या मुलभूत प्रश्नाचे उत्तर कोण देणार ? त्याचे दायित्व कोण स्विकारणार ? कारवाई केंव्हा करणार ? कोणी उपोषण केले पाहिजे ? कोणी न्यायालयाकडे दाद मागितली पाहिजे ? इत्यादी प्रश्न आजही महाराष्ट्र राज्यात दबक्या आवाजाने सर्वच जन भयभित अवस्थेत एकमेकास विचारीत आहेत.अजुनही वेळ गेलेली नाही. समानतेवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. परिपत्रके व आदेश कायद्याच्या चौकटीत असण्याची आवश्यकता आहे. गैरलागू परिपत्रके रद्द करण्याची आवश्यकता आहे. ठेवी व त्यावरील व्याज न देणाऱ्या कुठल्याही सहकारी संस्थांच्या संचालकांवर साखर कारखान्यांसहित त्वरीत कारवाई होणे आवश्यक आहे. समान कारवाईची भुमिका त्वरीत कृतीने दाखविण्याची गरज आहे. हे जर झाले नाही

तर **जनतेकडून वसुल केलेल्या महसूलाची रक्कम व विविध उपक्रमाद्वारे मिळविलेल्या उत्पन्नांचा, घेतलेल्या कर्जांचा विनियोग ग्रामपंचायती, तालुका पंचायती, जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, विधानसभा, लोकसभा कशा करतात व शेवटच्या माणसाला एक रुपयातील २५ नये पैसे तरी पोहचतात का ?** ह्याचे उत्तर सर्वांना माहित आहे. आणि मग वरील शासकीय / निमशासकीय संस्थांमधील **ग्रामपंचायत सदस्य, तालुका पंचायत-जिल्हा परिषद-नगरपरिषद-नगरपालिका-महानगरपालिका-विधानसभा-लोकसभा सदस्यांना देखील निवडणूक लढताना ठेवी ठेवण्याचे बंधन प्रथम करावे लागेल.**

आणि हा विचार  मा.सहकार आयुक्तांनी केंव्हा केलाच नाही. या देशाची न्यायपालिका ही अजूनही सर्व सामन्य नागरीकांचे सर्वार्थाने रक्षण करते, व न्याय देते, हे  लक्षात घेणे आवश्यक आहे.

**आपले कोणीच काहीही करु शकत नाही** असे या राज्यात ज्यांना ज्यांना वाटते त्यांना, भारताचे संविधान वठणीवर आणू शकते, यांवर आमचा पुर्ण विश्वास आहे. अशा सत्ताधिशांचे, वाम मार्गाने करोडो रुपयांची माया जमविणाऱ्यांचे, सत्ता व पैशांच्या जिवावर जनतेस तुच्छ मानणाऱ्यांचे, कार्यकर्त्यांना लाचार व हतबल करणाऱ्यांचे, निर्लज्यपणे विकासाच्या – भ्रष्टाचाराच्या व चांगुलपणाची भाषणे ठोकणाऱ्यांचे तसेच सत्ता व पैशांच्या जिवावर प्रसिध्दी करुन, जनतेची दिशाभूल करुन, मते खरेदी करुन निवडणूक जिंकणाऱ्यांची मस्ती जिरविण्यासाठी जनप्रक्षोभ नजिकच्या काळात होणारच आहे.

पतसंस्थांनी कर्जामधून ठेवींच्या कपाती करू नयेत, इमारत निधी कापू नये, वर्गणी व  देणग्या घेवू नये असे परिपत्रक राज्याचे मा. सहकार आयुक्त एका बाजूला काढतात व दुसऱ्या बाजूला सहकारी साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ऊसाच्या बिलातून परस्पर ठेवींच्या कपाती करण्याची व त्यावर केवळ ६ टक्के व्याज देण्याची तरतूद मा. साखर आयुक्त कशी काय करू शकतात? याचे उत्तर संविधानाने चांगल्या शब्दात दिले आहे.
म्हणून इशारा देण्यात येतो की, एवढा अतिरेक करू नका. या नियतीच्या खेळा बद्दल इतिहासात अनेक उदाहरणे आहेत. एवढी मस्ती, व सर्वसामान्यांना  नाडणाऱ्या प्रवृत्तीबद्दल भारताच्या संविधानाने ज्यांच्यावर   हे काम सोपविले आहे त्यांनी त्वरीत दुरूस्त होणे आवश्यक आहे.

अग्रलेखातील हे विचार व निवेदन राज्यातील बँका व पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांमध्ये, संचालकांमध्ये वैचारिक क्रांती घडवून आणण्यासाठी व निर्भिडपणे ही चळचळ चालविण्यासाठी छोटीशी ऊर्जा उत्पन्न करु शकेल असे आम्हाला वाटते. तसेच ज्यांनी कायदा हातात घेवून परिपत्रके काढली व समानतेचा ज्यांना विसर पडला अशांनी त्वरीत आपापल्या स्तरावर दुरुस्त व्हावे असे आम्हाला वाटते. आपल्या सर्वांना दसऱ्याच्या शुभ मूहूर्तावर वैचारिक सिमोल्लंघनाची जबाबदारी स्विकारण्यासाठी शुभेच्छा देतो.व वरील संबंधित सर्वांना सुबुध्दी सुचेल अशी अपेक्षा करतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**